
संघर्षाच्या काटेरी वाटेवरून वाटचाल करत नि दोन सुपरस्टारांचा तगडा मुकाबला करत धर्मेंद्रनी अभिनय कारकीर्दीची पस्तीस वर्षे या क्षेत्रात टिकाव धरला. मात्र या पस्तीस वर्षांत एकदाही पुरस्काराचा लाभ त्यांना झाला नाही. पण त्याचे दुःख या अभिनेत्याला नाही. रसिकांचे प्रेम नि दोन मुलांची सिनेक्षेत्रातील घोडदौड हीच आज त्यांच्यासाठी अतीव आनंदाची गोष्ट आहे. बॉबी व सनीचा *दिल्लगी* पडद्यावर येऊ घातलाय. त्यानिमित्ताने धरमपांनी व्यक्त केलेले मनोगत...

□ राजेश श्रीवास्तव




धर्मेंद्र: मला माझ्या मुलांचा अभिमान वाटतो!

लुधियानाच्या ललतों गावात माझे बालपण गेले. सहावी-सातवीपर्यंत तर शहर कशाला म्हणतात हे मला ठाऊक नव्हते. सातवीत गेलो तेव्हा मात्र माझा एक मित्र शहरात जाऊन चित्रपट पाहून आला. त्याने शहराचे नि तिकडे पाहिलेल्या चलचित्राचे जे वर्णन केले तेव्हा शहर काय असावे याचे चित्र मी कल्पनेने डोळ्यापुढे उभे केले. चित्रपट पाहून आल्यावर तो आम्हा वर्गातल्या मुलांना आजूबाजूला घेऊन वर्णन करू लागला की पडद्यावर चित्रे हलतात-बोलतात. मला वाटले की कदाचित कॅलेंडर्समधील फोटो कापून हलवत असतील नि मागून कुणी बोलत असतील. बैसाखीच्या मेळ्यांमध्ये कठपुतळ्यांचा खेळ दाखवतात ना तसे. त्यामुळे चित्रपटाबाबत माझ्या मनात विशेष उत्सुकता नव्हती.

आठव्या इयत्तेत गेलो तेव्हा माझ्या एका मामाच्या लग्नासाठी आम्ही शहरात गेलो. शहराची माझी ती पहिली गाठ. मामा आम्हा मुलांना चित्रपट पाह्यला घेऊन गेला. मला त्या चित्रपटातले विशेष काही नाही आठवत. आठवतो आहे तो फक्त याकूबचा चेहरा. अंधाऱ्या हॉलमध्ये कधी रस्त्यावर मोटार धावताना दिसायची तर कधी धुंवाधार पाऊस पडताना दिसायचा. मी डोळे फाडफाडून पडद्यावरील चित्रे बघत होतो. चित्रपट पूर्ण होताच पडदा पांढरा शुभ्र झाला. तेव्हा विश्वासच बसेना की, क्षणभरापूर्वी याच पडद्यावर गाड्या धावल्या नि पाऊस पडला होता.

नंतर मी दिलीपकुमारांचा *शहीद* पाहिला. झाले, इथून खऱ्या अर्थाने मला चित्रपटाचे व्यसन जडले. दिलीपकुमारांच्या अभिनयाचा मी दिवाना झालो. शेतात नांगर चालवताना, वर्गात शिकत असताना दिलीपकुमारांच्या शैलीत मी बोलू लागलो, आपण दिलीपकुमार सहज बनू शकतो, ही खात्री पटली होती पण मनातली गोष्ट जिभेवर यायला धजत नव्हती. लोक आपली थट्टा करतील असे वाटायचे. शाळा चुकवून वडलांना पत्ता लागू न देता चित्रपट पाह्यचो. कॉलेज शिक्षणासाठी मी फगवाड्याला गेलो. तिथे खूप चित्रपट पाह्यले. कधी अभ्यासाचे तर कधी कॉलेज चुकवून चित्रपट पहाणे सुरू होते. याच दरम्यान अभिनेता बनायच्या महत्त्वाकांक्षेने झपाटले. शेवटी राहवले नाही तेव्हा मी आपली महत्वाकांक्षा घरच्यांसमोर बोलून दाखवलीय. आधी वडलांनी नकार दिला. तिथल्या दुर्गुणांची यादी ऐकवली आणि चित्रसृष्टीपासून चार हात दूर राहणेच बेहत्तर असे समजावले पण नंतर माझा भक्कम इरादा ऐकून त्यांनीही मला त्या निर्णयापासून परावृत्त करण्याचा विचार बाजूला ठेवला. ते मला एकदा म्हणाले, चित्रपटात काम करायचे आहे तर का अर्ज करून पाठवत नाहीस? त्यांच्या भोळसटपणावर हसत मी म्हणालो की, पापाजी ती काही नोकरी नाही, की अर्ज केला नि तिकडे चिकटलो. त्यासाठी मुंबई गाठावी लागेल. स्टुडियोत फेऱ्या घालाव्या लागतील. त्या काळात घरच्यांना लपवून मी माधुरी हे सिनेनियतकालीक वाचायचो. त्यात एकदा एक जाहिरात नजरेस पडली. फिल्मफेअरने नव्या चेहऱ्यांची स्पर्धा आयोजित केली होती. दिग्दर्शक गुरू दत्त व बिमल रॉय परीक्षक होते. मी छायाचित्रासह अर्ज भरून पाठवला.

अनुभववाल्या परिच्छेदात मी दिलीपकुमारांची हुबेहूब नक्कल करू शकतो असे लिहिले. १९५७चा हा किस्सा. माझ्या अर्जाची काही पोचपावती आली नाही तेव्हा मी आशा सोडली. पुन्हा लुधियानातल्या आमच्या शेतात मी कामाला लागलो. वयाच्या एकोणीसाव्या वर्षी प्रकाशबरोबर माझे लग्न झाले. तिची जबाबदारी माझ्यावर आली. आता नोकरीधंदा करणे अधिकच अत्यावश्यक वाटू लागले होते. एकेदिवशी शेतात अठरा तास राबून घरी आलो तेव्हा हातात एक लिफाफा पडला. त्यातले पत्र वाचून मी हरखून गेलो. माझ्या आनंदाला पारावर उरला नाही. कारण स्क्रीन टेस्टसाठी मला मुंबईला बोलावणे आले होते. १९५८च्या एप्रिलमधील ही गोष्ट. मी तात्काळ मुंबईला येऊन दाखल झालो. मुंबईत आल्यावर सिनेइंडस्ट्रीबद्दल मनात जी प्रतिमा होती ती वेगळीच निघाली. मला वाटले की सिनेइंडस्ट्री ही एक संस्था असेल. सगळे रात्री क्लबमध्ये जमत असतील. त्यांची घरे एका विशिष्ट वसाहतीत असतील. दिवसभर सगळे एकत्र काम करत असतील. पण मी इथे आल्यावर मला वेगळेच दिसले. मी इथे आलो तेव्हा स्पर्धेच्या अन्य स्पर्धकांसह मलाही पंचतारांकित हॉटेलात ठेवण्यात आले होते. मी पंचतारांकित हॉटेलचे ते देदीप्य वातावरण पाहून गडबडून गेलो होतो. फगवाड्यातील गल्लीबोळात हिरोगिरी करणारा मी पंचतारांकित हॉटेलच्या प्रकाशात साफच बुजून गेलो होतो. माझ्यासाठी ते कारागृहच होते. अन्य स्पर्धकांना कदाचित तिथे राहण्यात खूप मौज वाटली असेल पण मी मात्र अगदी कोमेजलो होतो याच काळात मोहन स्टुडियोमध्ये अर्जुन हिंगोरानी यांच्याशी माझी गाठ पडली. मुंबईमध्ये जळीस्थळी कल्पनाविश्वात रमणारीच माणसं मला भेटत होती.



बॉबी व पत्नी प्रकाश यांच्यासह धर्मेंद्र



एशा व आहनासह धर्मेंद्रची स्टारपत्नी हेमा



धर्मेंद्र आपल्या स्टार मुलांसह

अर्जुनही मला त्यांच्यासारखाच एक वाटला. अर्जुन म्हणाला की, मी चित्रपट बनवेन तेव्हा तुला मी हीरो म्हणून घेईन. मीही त्याच्या कल्पना विश्वात थोडा भटकून यायचो. फिल्मफेअरची स्पर्धा झाली आणि मी शेवटी स्पर्धेचा विजेता ठरलो. बिमल रॉय व गुरू दत्त यांनी माझे कौतुक केले. बिमलदांनी मला *बंदिनी* चित्रपटात घेण्याचे आश्वासन दिले ते *बंदिनी* सुरू करणार होते. गुरू

त्त यांचा एक चित्रपट तेव्हा पूर्ण झाला होता. पण पुढच्या चित्रपटात तुला घेईन असे आश्वासन द्यायला तेही विसरले नव्हते. मला वाटले, झालं, मी सगळ्या आघाड्यांवर विजयी ठरलोय. पण नाही माझ्या संघर्षाची तीच तर खरी सुरूवात होती. मुंबईच्या रस्त्यांवर माझी भ्रमती सुरू झाली. काम मिळत नव्हते. खिसा रिकामा होत चालला होता. मी खर्चावर नियंत्रण आणू लागलो. कधी कधी संपूर्ण दिवस कटिंग चहावर काढायचो. कधी कधी चहा पावावरच रात्र काढावी लागे. उपाशी पोटी तर कित्येक रात्री राह्यलो असेन. सकाळ होताच सार्वजनिक प्याऊंवर पाणी पिऊन पोट भरायचो. या काळात पंचतारांकित हॉटेलातले क्षण मला सुखद स्वप्नासारखे वाटत. खूप धावाधाव करूनही काम मिळत नसे तेव्हा मी हताश व्हायचो. तेव्हा वाटायचे की, का मी माझा वेळ वाया घालवतोय इथे? त्यापेक्षा गावात जाऊन शेती करणे काय वाईट? पण पुन्हा सिनेमाची पोस्टर्स नजरेस पडायची नि आतून माझे मन सांगायचे की या पोस्टर्सवर कधीतरी तुझाही फोटो झळकेल. मग मी पुन्हा मन घट्ट करून शहरात राह्यचा निर्णय पक्का करायचो. आता काही बनल्याशिवाय गावाला जायचे नाही असे पक्के ठरवून मी येईल त्या संकटाचा सामना करायचे ठरवले.

मोठ्या कालावधीनंतर सुबोध मुखर्जी या निर्मात्यांनी मला *लव्ह इन सिमला*मध्ये काम देण्यासाठी बोलावले. मला वाटले आता गाडी रूळाला लागली. पण संघर्ष पाठ सोडायला तयार नव्हता. स्क्रीनटेस्ट झाली. सगळे काम सुरू झाले. चित्रीकरणाच्या तारखा नक्की ठरल्या तेव्हा अचानक दिग्दर्शकाला जाटयुग पसंत नसल्याचे कारण तोंडावर मारले गेले. निर्माता तेव्हा म्हणाला की, मला अभिनेता हवाय, फूटबॉल खेळाडू नकोय. हे ऐकून मला खूप वाईट वाटले. पण करतो काय? मी चुपचाप सहन केले नि तिकडून परतलो.



निर्माते अर्जुन हिंगोरानींसह धर्मेंद्र


एक-दोन ठिकाणी काम मिळाले तर दोन-चार रीळांनंतर चित्रपट बंदच पडला. फिल्मीस्तानचा एक जाहिरातपट दोन रीळे बनला त्यात मी अगदी सुकल्यासारखा दिसत होतो. कॅमेऱ्यापुढे त्यामुळे मी खूपच नर्व्हस होतो. यासुमारास इतका निराश होतो की, कुणी छोटी भूमिका दिली तरी बहेत्तर असे वाटे. नाही उद्या व्हायचे आजच होऊ दे नि एकदा काय तो सोक्षमोक्ष होऊ दे असे वाटे. त्या काळात पुन्हा एकदा अर्जुन हिंगोरानीची भेट झाली.


त्याच्याबरोबर त्याचेच दोन मित्र होते. टी. एम. बिहारी व मान ठाकूर. हे तिघे तसे कडकाबालूस. पण त्यांनी कुठूनतरी भांडवलाची व्यवस्था केलेली नि *दिल भी तेरा हम भी तेरे* चित्रपटाचा घाट घातला होता. यात काम करण्याची संधी अर्जुनने मला दिली. माझ्याकडे विचार करायला वेळ कुठे होता? मी काम केले. ५१ रूपये मानधन मला मिळाले. बलराज साहनी त्यात मुख्य अभिनेते होते. माझी भूमिका बॉक्सरची होती. चित्रपट कसाबसा पूर्ण झाला. पण तिकीटबारीवर तो चालला नाही. प्रेक्षकांना बॉक्सर आवडला नाही. मात्र समीक्षकांनी माझ्या कामाचे कौतुक केले. माझ्याबद्दल आशा असल्याचे विधान केले. बिमलदांनी ठरल्यानुसार *बंदिनी*साठी मला बोलावले. मला त्यात डॉक्टरची भूमिका मिळाली. बिमलदांच्या चित्रपटात होमवर्क आवश्यक असतं.

हेमाबरोबर चरसच्या दृश्यात



देवरमध्ये देवेन वर्मासह





राजेंद्रकुमार यांच्याबरोबर *गरम धरम*च्या पार्टीत

मी दोन महिने डॉक्टरांचे निरीक्षण करत होतो. अशोककुमार त्या चित्रपटात क्रांतिकारकाची भूमिका करत होते. ते तेव्हाचे लोकप्रिय अभिनेते होते. नूतनही ताकदीची अभिनेत्री होती. *बंदिनी* पडद्यावर झळकला आणि लोकांना मी आवडलो. माझ्या कामाची सर्वांनीच प्रशंसा केली. तरी गाडी रूळाला लागली नव्हतीच. धक्के खाणे संपतच नव्हते.

निर्माते रमेश सहगल यांच्याकडून कामाचा मोबदला मिळायचा होता. पण त्यांना फोन करून मोबदला मागू नव्हतो शकत. त्यामुळे वर्सोव्याहून वांद्र्याच्या मेहबूब स्टुडियोपर्यंत चालत आलो. तिथे रमेश सहगल डोक्याला हात लावून बसलेले दिसले. मी त्यांच्याकडे पैसे मागण्याचे धारिष्ट्य नव्हतो करू शकलो. मात्र पोटात आगीचा वणवा पेटलेला. खिशात एक कपर्दिकही नव्हती शेवटी मी वांद्र्याहून दादरला आलो. तिथे काकेदा हॉटेलचा मालक खूप दयाळू होता. गरीब नि संघर्ष करणाऱ्यांना तो फुकट खाऊ पिऊ घालायचा. मी त्या मालकाकडे दहा रूपये मागितले. त्याने पैसे द्यायला नकार दिला तेव्हा समजावले की, खाण्याचा हिशेब कुणी लक्षात ठेवत नाही त्यापेक्षा पैसे मी परत तरी देऊ शकेन. माझ्या या वक्तव्यावर मालक खुश झाला त्याने दहा रूपये काढून दिले. मी बाजूलाच असणाऱ्या प्रीतममध्ये बसून पाच रूपयात भरपेट जेवलो.

संकटसमयी पुन्हा एकदा अर्जुन हिंगोरानी भेटला. *शोला और शबनम*मध्ये हीरोचा प्रस्ताव मला त्याने दिला. दिग्दर्शक म्हणून कारकीर्द बनवण्यासाठी तोही संघर्ष करत होता. मी अर्जुनचा प्रस्ताव स्वीकारला. हा चित्रपट पडद्यावर बरा चालला. या चित्रपटाने स्टारपद मिळवून दिले नि त्याचबरोबर देशी जेम्सबॉण्ड म्हणून मला स्थिर केले.

एक किस्सा आठवला म्हणून सांगतो... दोनेक वाजण्याचा सुमार होता. मी काचेच्या टेबलावर डोके टेकून आराम करत होतो. तेव्हा दिग्दर्शक माझ्याजवळ येऊन माझ्यावर दारू प्यायल्याचा आरोप करू लागला. मी त्याच्या चिडण्यावर इतका रागावलो की, मी तात्काळ दारूची बाटली मागवली व त्याच्यासमोर अख्खी बाटली प्यायलो आणि मला तुझ्याबरोबर काम करायचे नाही असे स्पष्ट त्याला सांगितले. चारपाच दिवस मी चित्रीकरण केले नाही. पण एका मध्यस्थीच्यामुळे समाधान करवले गेले आणि चित्रपट पूर्ण झाला तो चित्रपट होता *फूल और पत्थर*. *फूल और पत्थर*नंतर *देवर* व *अनुपमा* पडद्यावर झळकले. तिन्ही चित्रपटात माझ्या भूमिका वेगवेगळ्या होत्या. *देवर* व *अनुपमा*ने मला अभिनेता म्हणून ओळख दिली. इथे संघर्ष पूर्ण झाला. ३६ वर्षाच्या कारकीर्दीत कित्येकदा मीही इतरांसारखा गडबडून गेलो असतो. राजेश खन्नाच्या सुपरस्टारपदाने अनेकांचे धाबे दणाणून टाकले. अमिताभच्या अँग्री यंग मॅन इमेजने कित्येकांना धूळ चारली. *जंजीर* चित्रपट प्रकाश मेहरांनी आधी मला देऊ केलेला पण तारखांचा मेळ जमेना म्हणून मला नकार द्यावा लागला. त्या चित्रपटाने अमिताभला सुपरस्टार बनवले.

माझी दुर्बलता ही होती की, मी नकार नव्हतो देऊ शकत. *राम बलराम*, *प्रोफेसर प्यारेलाल* व *शालीमार* सारखे कितीतरी वाह्यात चित्रपटही मी केले नि कारकीर्दीचा जुगार खेळलो. आजही मी त्या दुर्बलतेवर काबू नाही मिळवू शकलेलो. सुरूवातीला माझ्या नायिकांचे पारडे वजनदार असे. *अनपढ*मध्ये तर मी मध्यंतरापूर्वीच मरतो. नंतर चित्रपटभर माला सिन्हाच दिसते.

मीनाकुमारीबरोबर *दिल भी तेरे हम भी तेरे*



नूतनसह *बंदिनी*त





दिल्लगीच्या कॅसेटप्रकाशनसमारंभी सनी, बॉबी व भरत शाह यांच्याबरोबर धरमपाजी

मोहनकुमार यांच्या *आयी मिलन की बेला*मध्ये मला राजेंद्रकुमारसमोर भूमिका मिळाली. मी व्हिलन होतो. पण हीरोला मी मारतो तेव्हा लोक टाळ्या वाजवू लागले. असे पहिल्यांदाच होत होते. *देव*रमध्येही मी क्रुद्ध पात्र केले. मी प्रेक्षकांचा लाडका झालो. नूतनचे पती कॅप्टन बहल यांनी मला घेऊन *सूरत और सिरत* चित्रपट बनवला. हा चित्रपट एकदम फ्लॉप झाला. त्यानंतर चेतन आनंद यांच्या *हकीकत*ने फ्लॉपचा शिक्का धुवून काढला. समीक्षकांनी माझी स्तुती केली. चाहत्यांची हजारो पत्रे येऊ लागली.

खरंतर *फूल और पत्थर*च्या यशाने मला हीमॅनची इमेज दिली. त्यातील एक दृश्य खूपच प्रशंसनीय होते. दारूच्या नशेत बेभान झालेला हीरो कडाक्याच्या थंडीत कुडकुडणाऱ्या अभिनेत्रीच्या अंगावर स्वतःचा शर्ट घालतो. याच चित्रपटातील आणखी एका भयंकर दृश्यात आगीच्या ज्वालातून फरिदा जलालला बाहेर काढताना मी अक्षरशः भाजलो होतो. माझ्या कारकीर्दीचा हा शेवट आहे असे मला वाटू लागले होते परंतु लोकांनी पुन्हा माझ्या कारकीर्दीला भक्कम बनवले.

मीनाकुमारीसमोर मी विद्यार्थीच होतो. आमची जोडी लोकांना खूपच आवडली होती. *पाकीजा*मध्ये आधी मी काम करत होतो. बरेचसे चित्रीकरणही झाले होते. नंतर मला वगळून राजकुमारला घेण्यात आले. त्यानंतर कमाल अमरोहींनी मला घेऊन *रझिया सुलतान* बनवला.

मी कमाल अमरोहींचा फॅन होतो. त्यांच्याबरोबर काम करण्याच्या आनंद अनोखा होता. मीनाकुमारीसह *फूल और पत्थर, चंदन का पालना,* राज कपूरसह *मेरा नाम जोकर,* वैजयंतीमालासह *प्यार ही प्यार,* दिलीपकुमारसह बंगाली चित्रपट *पारी*मध्ये काम करण्याची संधी मिळाली. परंतु मेहबूब खान आणि सोहराब मोदी यांच्याबरोबर मी काम करू शकलो नाही याचीच खंत वाटते. आज एक चित्रपट हिट झाला तर हीरोचे मानधन पन्नास-पंच्याहत्तर लाखाच्या घरात जाते. मी कधीच डोळे बंद करून मानधन वाढवले नाही.

मला पुरस्कार का नाही मिळाला याबद्दल बरेच जण विचारतात तेव्हा मी त्यांना एवढेच सांगतो की, एकदा पुरस्कारासाठी माझ्याकडे पैशाची मागणी करण्यात आली होती. मी नकार दिला तेव्हापासून पुरस्काराचा उत्साह संपला. खरा पुरस्कार तर मला माझ्या प्रेक्षकांकडूनच मिळतो.

दारूचे व्यसन वाईट आहे हे माहित असूनही मी दारू सोडली नाही. पण दारूच्या नशेत मी कधीच भरकटलो नाही. निर्माता सलीमच्या *कयामत*मध्ये सूडाच्या भावनेने पेटलेल्या पूनम धिल्लाँवर बलात्काराचे दृश्य द्यायचे होते. मात्र स्वभावाने लाजाळू असल्याने त्या दृश्यावर म्हणावा तसा प्रभाव मी पाडू शकत नव्हतो. त्यामुळे दारू पिऊन मी ते दृश्य दिले नि तेव्हाच ते केले. मी सनीला म्हणालो की, मी दारू बिलकूल सोडलीय. आता मी दारूला शिवतही नाही. तो खदखदून हसत म्हणाला, 'पापा आप कितनी सालोंसे शराब छोडने की कसम खाते रहे है?' नियमित जॉगिंग करत असल्यामुळे माझी प्रकृती आजही निरोगी आहे.

पंजाबमध्ये मी इतका लोकप्रिय आहे की, माझ्या सुमार चित्रपटांनीही तिथे बऱ्यापैकी व्यवसाय केलाय. तिथे शूटिंगसाठी गेलो तर तिथल्या गावकऱ्यांच्या घरी जाऊन त्यांच्याबरोबर बसून मी जेवतो. कधी कधी शेतात नांगर अथवा ट्रॅक्टरही चालवतो. एकदा तर आमच्या जाट समाजातील लोकांनी माझ्या वजनाएवढे रक्तदानही केले होते.

अभिनेता झालो नसतो तर एव्हाना सैन्यात भरती होऊन मी सैन्यात मोठ्या हुद्यावर असतो. मी तेहरान, बेहरीन, सिंगापूर आणि जपान येथे गेलो होतो तेव्हा मला माझ्या मातृभूमीची खूप आठवण यायची. जपानहून आमचे विमान कलकत्ता विमानतळावर उतरले तेव्हा मी चक्क जमिनीवरच बसलो. देशाइतकीच तिथे आईवडलांचीही मला फार आठवण येत असे.

भांगडाशिवाय मी इतर कोणतेही नृत्य करू शकत नाही. मास्टरजीही मला शिकवू शकत नव्हते ते म्हणायचे, मी दगड पाण्यावर तरंगावू शकतो झाडांना नाचवू शकतो पण तुला नाही नाचवू शकणार.

लोक काय वाट्टेल ते म्हणोत पण सनी बॉबी माझ्या नजरेसमोर संघर्ष करताहेत हे मी सहनच नाही करू शकत. दोघे रोज व्यायाम व जॉगिंग करून घाम तर गाळताहेत.

मी आयुष्याची कमाई फक्त दारूत उडवली नाही. कुटुंबाच्या स्थैर्यासाठी सुरू केलेला व्यवसाय उत्तम चालतोय. माझे स्वतःचे बॅनरही सुरू केले. मी मात्र मनासारखे चित्रपटच करतोय. लोक म्हणतात, धर्मेंद्रची अनेक प्रेम प्रकरणे सहन करणारी चार मुलांची आई प्रकाश हिच्या संयमाला दाद द्यायला हवी. मीही प्रकाशच्या संयमाला दाद देतो. तिच्यामुळेच आज मी इथवर पोहोचू शकलो. पण मी प्रकाशवर अन्याय केलेला नाही.

अनेक स्टार्स फ्लॉप जातात पण माझी मुलं नेटाने प्रयत्न करताहेत. सनी व बॉबी स्टारपदाच्या रेसमध्ये सामील आहेत. *दिल्लगी* द्वारा सनीने माझ्याही पुढे मजल मारलीय. तो दिग्दर्शनात उतरला. सनी व बॉबी यांच्याबद्दल मला अभिमान आहे. मी अभिमानाने आज म्हणू शकतो की मी सनी व बॉबीचा बाप आहे. मी स्टारपिता आहे. ●